# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६२६/२०१७/१९

**(नोदंणी क्रमांक २०१७०४००५५)**

तक्रार दाखल दिनांक :- ११.०४.२०१७
निकाल दिनांक :- ०६.०६.२०१७

श्री. अमोल बाबासाहेब ऐरंडे तक्रारदार
प्लॉट नं. ६२, गट नं.१६,
प्रकाश नगर, सातारा परिसर,
औरंगाबाद
(ग्राहक क्रमांक ४९००१८१९२८९३)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

| | |
|---|---|
| १ ) डॉ.भास्कर पालवे | अध्यक्ष |
| २ ) श्री. लक्ष्मण मु. काकडे | सदस्य / सचिव |
| ३ ) श्री. वि. सु. काबरा | सदस्य |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. अमोल बाबासाहेब ऐरंडे, प्लॉट नं. ६२, गट नं.१६, प्रकाश नगर, सातारा परिसर, औरंगाबाद हे महावितरणचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१८१९२८९३ असा आहे. त्यांनी गैरअर्जदार कार्यकारी अभियंता तथा नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे विरुध्द महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ नमुन्यात दिनांक ११.०४.२०१७ रोजी तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.

**तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालील प्रमाणे आहे.**

माहे फेब्रुवारी २०१४ ते माहे जानेवारी २०१७ पर्यंतचे दिलेले चुकीचे बील रद्द करुन नवीन सुधारीत वीज बील मिळण्याची विनंती अर्जदाराने केली आहे.

अर्जदाराने दिनांक ३१.०१.२०१४ पासून घरगुती वापराचे सिंगल फेज वीज कनेक्शन घेतलेले असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१८१९२८९३ हा असून त्यांचा मीटर क्रमांक जीटीएल ६३०२८ होता. अर्जदाराचे घर तीन रुमचे असून घरात राहणाऱ्या तीन माणसांपैकी अर्जदार हे स्वतः शिक्षक असून नोकरी निमित्त बाहेरगावी असतात.

दिनांक ३१.०१.२०१४ पासून जीटीएल कंपनीकडुन अर्जदाराने मीटर घेतले असून माहे फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, जून, जुलै २०१४ पर्यंत **RNA, INACCE** दाखवुन माहे ऑगस्ट २०१४ मध्ये एकत्रित युनिट १८१६ दाखवुन या युनिटची विभागणी सात महिन्यात करण्या ऐवजी सहा महिन्यात करुन क्रेडीट म्हणुन रुपये ५०४१.६५ करुन एकुण बील रुपये ११५३८.७३ इतके देण्यात आले. हे चुकीचे वीज बील असून तरी देखील अर्जदाराने त्याचा भरणा दि.१२.०९.२०१४ रोजी रुपये ११५४०/- एवढा केलेला आहे. त्यानंतर पुन्हा सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २०१४ व जानेवारी, मार्च २०१५ या महिन्यात **LOCKED** दाखवुन माहे मार्च २०१५ या महिन्यात एकत्रित ६११ युनिट दाखवुन त्याची विभागणी सात महिन्यात करण्या ऐवजी पाच महिन्यात करण्यात आली व क्रेडीट म्हणुन रुपये ६३८६.९३ दाखवुन रुपये ५७१८.६२ चे वीज बील अर्जदारास देण्यात आले. चुकीचे वीज बील

असल्यामुळे अर्जदाराने त्याचा भरणा केला नाही. चुकीचे वीज बील दुरुस्तीसाठी अर्जदाराने जीटीएल कंपनी कडे लेखी / तोंडी तक्रार केली होती. तरीही वीज बिलात दुरुस्ती झाली नाही. आतापर्यंत अशी सर्व चुकीची वीज बिले देण्यात आली व शेवटी माहे डिसेंबर २०१६ मध्ये एकत्रित २५०३ युनिट दाखवुन रुपये ७२,७६०/- जास्तीचे व अवाजवी बील देण्यात आले. या चुकीच्या वीज बिलाची लेखी स्वरुपात तक्रार महावितरण कंपनीकडे केलेली आहे. तरी अर्जदार यांना हे जास्तीचे वेगाने पळणारे मीटर बदलुन मिळाले नाही व वीज बिलही दुरुस्त करुन मिळाले नाही.

दिनांक ०९.०१.२०१७ रोजी अर्जदाराने कार्यकारी अभियंता, तक्रार निवारण कक्ष, औरंगाबाद यांचेकडे लेखी स्वरुपात तक्रार दाखल केली. त्यानंतर दिनांक २८.०१.२०१७ रोजी अर्जदारास नविन मीटर क्रमांक १३४५३७२२ हे देण्यात आले. त्याचा त्याच्यावरील युनिटचा वेग बघता जुने मीटर क्रमांक जीटीएल ६३०२८ चुकीचे व जास्तीचे युनिट पडत असल्याचे लक्षात आले. अर्जदारास आतापर्यंत चुकीचे वीज बील दिल्यामुळे मानसिक त्रास सहन करीत आहेत.

अर्जदाराने विनंती केली आहे की, नविन मिटर प्रमाणे २०१४ पासून सुधारीत वीज बील दुरुस्ती करावी व जुने ७८८०८/- रुपयांचे वीज बील रद्द करावे त्याचा भरणा अर्जदार करण्यास तयार आहे.

**कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे म्हणणे.**

कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, महावितरण, छावणी उपविभाग, औरंगाबाद यांनी त्यांचे पत्र दिनांक १७.०५.२०१७ नुसार असे सादर केले आहे की, ग्राहकास देण्यात आलेले वीज देयक हे मीटर वाचना प्रमाणे बरोबर आहे, तसेच ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांचे आदेशानुसार दिनांक ०१.०२.२०१७ रोजी ग्राहकाचे मीटर क्रमांक जीटीएल ६३०२८ हे चाचणी विभागाकडुन तपासुन घेतले असता अचूक आढळुन आले आहे, करीता ग्राहकास देण्यात आलेले देयक बरोबर आहे.

**<u>ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे  निष्कर्ष</u>**

१)	ग्राहकाचे सीपीएल तपासले असता असे आढळुन आले आहे की, जीटीएल ने बसविलेले जूने मीटर क्रमांक ६३०२८ नुसार दाखविण्यात आलेले दर महिन्याचे वीज वापराचे युनिट हे अवाजवी व चुकीचे वाटतात.

२)	ग्राहकास दिनांक २८.०१.२०१७ नवीन मीटर क्रमांक १३४५३७२२ देण्यात आला.  या मीटर नुसार दाखविण्यात आलेला वीज वापर कमी प्रमाणात असल्याचे दिसून येते.

३)	ग्राहकाने सुरुवातीपासून जुने मीटर चुकीचे व अवाजवी विजेचा वापार दाखवत आहे अशी तक्रार सुरुवातीपासून वेळोवेळी केलेली आहे.  परंतु त्यांच्या तक्रारीची योग्य दखल घेण्यात आलेली नाही.

४)	जुन्या मीटरची चाचणी योग्य प्रकारे करण्यात आलेली नाही व ग्राहकास भरमसाठ वीज बिले देण्यात आली. ती भरणे ग्राहकाच्या आवाक्याबाहेर वाटतात.

५)	सदर ग्राहकास नवीन मीटर बसविल्यापासून सुमारे तीन महिन्यात ३२५ युनिट वापरल्याचे दिसून येते. त्यामुळे दरमहा विजेचा वापर १०० युनिट दिसून येतो.  ग्राहकास सुरुवातीपासून म्हणजे ३१.०१.२०१४ पासून सरासरी दरमहा १०८ युनिट या प्रमाणे वीज बिल देणे आवश्यक आहे.

६)	जुने वीज बील रद्द करुन नवीन वीज बील दरमहा सरासरी १०८ युनिट प्रमाणे दिनांक ३१.०१.२०१४ पासून देण्यात यावे व ग्राहकाने भरलेली रक्कम त्यातून वजा करुन नवीन सुधारीत वीज बील देण्यात यावे अशी मंचाची धारणा आहे.

वरील प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार यांनी सूनावणी दरम्यान सादर केलेले म्हणणे,  त्याचप्रमाणे ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंचाने काढलेले निष्कर्ष याचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) जीटीएल कंपनीने बसविलेल्या जुन्या मीटर क्रमांक ६३०२८ वरील सर्व चुकीची वीज बिले रद्द करण्यात येत आहेत.

२) अर्जदारास सुरुवातीपासून म्हणजे दिनांक ३१.०१.२०१४ पासून ते नविन मीटरच्या वीज वापरानुसार सरासरी दरमहा १०८ युनिट प्रमाणे सुधारीत वीज बील देण्यात यावे.

३) अर्जदाराने आतापर्यंत भरणा केलेली रक्कम सुधारीत वीज बिलातून वजा करण्यात यावी.

४) वीज बिलावर कोणतेही व्याज व दंड आकारण्यात येऊ नये.

५) वीज बील दुरुस्त न करणाऱ्या अधिकाऱ्यावर शिक्षेची कार्यवाही करण्यात यावी.

६) अर्जदारास झालेल्या मानसिक त्रासाबद्दल रुपये १०००/- ची भरपाई देण्यात यावी.

७) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |